# वसई-विरार शहर महानगरपालिका

## मालमत्ता कर विभाग, मुख्य कार्यालय

दि.२४/०४/२०२४

## प्रेस नोट

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येत आहे कि, सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाची मालमत्ता कर देयके वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

मालमत्ता धारकांच्या सोयीसाठी सन २०२४-२५ या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर देयके पाहण्याची तसेच डाऊनलोड करण्याची सुविधा महानगरपालिकेच्या www.vvcmc.in या सांकेतिक स्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे. नागरिकांना आपले मालमत्ता कर देयक पहावयाचे तसेच मालमत्ता कराचा भरणा करावयाचा असल्यास ऑनलाईन पद्धतीने (गुगल पे, फोन पे, नेट बँकिंग इत्यादी) कर भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेतील मुदतीत मालमत्ता कर भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करातून महानगरपालिके मार्फत विशेष सुट जाहीर करण्यात आलेली आहे ती खालीलप्रमाणे:

| सूटचा तपशील | |
|---|---|
| कालावधी | सूटचा दर (सामान्य करात) |
| १ एप्रिल २०२४ ते ३० जून २०२४ पर्यंत | ५% |
| १ जुलै २०२४ ते ३१ जुलै २०२४ पर्यंत | ३% |

तरी सर्व मालमत्ता धारकांनी वरील सवलतीचा लाभ घेऊन लवकरात लवकर आपल्या मालमत्ता कराचा भरणा करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

उप-आयुक्त (मालमत्ता कर)
वसई-विरार शहर महानगरपालिका